


Subscribe इयत्ता – चौथी (6 जुलै) माझा अभ्यास Subscribe

# शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

## दिवस सहावा : ☞ CLICK HERE



ब्रीज कोर्ससोबत चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट (वापरणे सक्ती नाही.)

उतारा वाचा व समजून घ्या.

## २. बोलणारी नदी


लीला पळत बर्फवाल्याकडे गेली. गोळा खाऊन परत आली. तिला बोलणारी नदी खूप आवडली. ताई, आई, माई यांच्यापेक्षा मोठी नदीबाई. तिची परवानगी मिळाली, की आपण हवे ते करू शकतो, असे तिला वाटले.

एक दिवस लीलाला आला कंटाळा. तिला वाटले बुडवावी शाळा. तिने ताईला विचारले. ताई म्हणाली, ''नको बुडवू शाळा.'' आई म्हणाली, ''नको बुडवू.''

माई म्हणाली,




*''लीला गं लीला,*
*आला जरी कंटाळा,*
*बुडवू नकोस शाळा.*
*शिकूनसवरून होशील*
*सुखी माझ्या बाळा.''*



लीला चिडली. कुणीच कसे शाळा बुडवू देत नाही ? 'शाळेला जाते', असे सांगून ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ''नदी गं नदी, लीलाला आलाय कंटाळा, बुडवावी वाटतेय शाळा. काय करू?'' पण नदी कशी बोलणार ? मग लीलाच बोलली, ''आलाय जर कंटाळा, तर बुडव बिनधास्त शाळा.''

ताई, आई, माईपेक्षा मोठ्या नदीबाईने परवानगी दिली म्हटल्यावर लीला शाळेला गेली नाही. दिवसभर नदीकाठी, वावरात खेळत राहिली. संध्याकाळी घरी आली. तिची ताई तिच्याच शाळेत सातवीत शिकत होती. लीलाने शाळा बुडवल्याचे तिला कळले होते. तिने आई अन् माईलापण सांगितले होते. त्या तिघींना लीलाची 'बोलणारी नदी'पण माहीत झाली होती. त्या तिघींनी लीलाची गंमत करायचे ठरवले. तिला शाळा बुडवल्याबद्दल कुणीच काही बोलले नाही.


टेस्ट सोडवा

वाचा व समजून घ्या.

## वर्तुळ



बांगडी




सायकलचे चाक



बैलगाडीचे चाक


वरील सर्व वस्तू वर्तुळाकार आहेत.

## वर्तुळ : वर्तुळकेंद्र, त्रिज्या, व्यास, जीवा



एक वाटी घ्या. वाटी कागदावर ठेवून वाटीच्या कडेने पेन्सिल फिरवा. वाटी बाजूला काढा. कागदावर मिळणारी आकृती वर्तुळ होय.

अशी दोन-तीन वर्तुळे काढा. वर्तुळाकार कागद कापून घ्या.



यांतील एक वर्तुळाकार कागद घेऊन त्याला चित्रात दाखवल्याप्रमाणे घडी घाला. घडीने झालेली रेघ पेन्सिलने गिरवा. ही रेघ म्हणजे वर्तुळाची **जीवा** होय.

आता दुसऱ्या वर्तुळाकार कागदाचे दोन अर्धे भाग होतील अशी घडी घाला. घडीने दाखवलेली रेघ पेन्सिलने गिरवा. ही रेघ म्हणजे वर्तुळाचा **व्यास** असतो.
वर्तुळाचा व्यास ही सुद्धा वर्तुळाची एक जीवा असते.

त्यानंतर कागदाचा पाव भाग होईल अशी आणखी एक घडी घाला.

टेस्ट सोडवा

## Read and understand.

### Circle



A bangle




A bicycle wheel



A cart-wheel


All the above objects are circular.

### Circle : Centre, radius, diameter, chord




Take a small steel bowl. Place it upside down on a piece of paper and trace its outline. Remove the bowl. The figure you get on the piece of paper is a circle.

Draw two or three circles like this one and cut out the circular paper shapes.




Take one of these shapes and fold it as shown in the picture. Trace the line of the fold with a pencil. This line is called a **chord** of the circle.



Now fold another circular shape to divide it into two halves. Trace the line of the fold with a pencil. This line is called a **diameter** of the circle.

The diameter, too, is a chord of the circle.



Now fold the shape again so that we get a quarter part of the shape.

## Words from Letters

**1. Read aloud the names of the letters on the cards.**
कार्डांवरील इंग्रजी अक्षरांची नावे मोठ्याने वाचा.

टेस्ट सोडवा

A B C D E
F G H I J
K L M N O
P Q R S T
U V W X Y Z

a b c d e
f g h i j
k l m n o
p q r s t
u v w x y z

**2. Say the names of the letters 'a' to 'z' in alphabetical order.**


**3. Form pairs. Say 'a-z' in pairs, in different ways.**

* a - b, c - d, e - f,
  g - h, i - j, k - l, .........

* ab - cd, ef - gh, ij - kl,
  mn - op, ........

* a - 1, b - 2, c - 3,
  d - 4, e - 5, ........

* a - z, b - y,
  c - x, ..., m - n.




HOME WORK

कार्डशीटच्या उभ्या पट्टीवर 'a' ते 'z' अक्षरे क्रमाने लिहून 'बुक-मार्क' तयार करा. असे रंगीत 'बुक-मार्क' तयार करून इतरांना भेट द्या.

## १. प्राण्यांचा जीवनक्रम

वाचा व समजून घ्या.



टेस्ट सोडवा

निरनिराळी फुलपाखरे

### माहीत आहे का तुम्हांला

स्वच्छ निवडलेले धान्य आपण डब्यात भरून ठेवतो, तरीही काही दिवसांनी डब्याचे झाकण काढले तर त्यात किडे झालेले दिसतात.

धान्याच्या गोदामात, वाण्याच्या दुकानात, आपल्या घरी अशा कोठल्याही ठिकाणी कीटक असू शकतात. कीटकाच्या मादीने या धान्यात अंडी घातली तरी ती आपल्याला दिसू शकत नाहीत. कारण ती आकारानी खूप लहान असतात. धान्य साठवलेल्या डब्यातील हवा आणि ऊब त्या अंड्यांच्या वाढीस पुरेशी असते.

म्हणूनच डब्यात त्यांची वाढ होत राहते. त्यांच्याही अंडी, सुरवंट, कोश, प्रौढ अशा अवस्था असतात. आपण डबा उघडतो तेव्हा धान्यात कीटक ज्या अवस्थेत असतात, त्या अवस्थेत आपल्याला पहायला मिळतात.

### आपण काय शिकलो

- कोंबडीच्या अंड्यामध्ये पिल्लाची वाढ होण्यासाठी कोंबडी अंडी उबवते. पूर्ण वाढ झालेले पिल्लू कवच फोडून बाहेर येते.
- फुलपाखरांच्या वाढीच्या अंडी, अळी, कोश आणि प्रौढ या चार अवस्था असतात.
- बिबळ्या कडवा या नावाचे फुलपाखरू रुईच्या पानावर अंडे घालते. अंड्यामधून अळी बाहेर पडते. तिला सुरवंट म्हणतात.
- वाढ पूर्ण झाल्यानंतर सुरवंट स्वतःभोवती एक आवरण तयार करतो. त्याला कोश म्हणतात.
- कोशातून पूर्ण वाढ झालेले फुलपाखरू बाहेर पडते. त्या वेळी त्याला सहा लांब पाय असतात. आकर्षक पंख असतात.

### हे नेहमी लक्षात ठेवा

फुलपाखरे आपल्या परिसराचाच एक भाग आहेत. गंमत म्हणून फुलपाखरे पकडणे, त्यांना दोरीने बांधून ठेवणे चुकीचे आहे.

टेस्ट सोडवा

# २. संतांची कामगिरी

महाराष्ट्रात श्रीचक्रधर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा या संतांपासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांमधून आलेल्या संतांनी पुढे चालविली. या संत मंडळींमध्ये संत गोरोबा, संत सावता, संत नरहरी, संत एकनाथ, संत शेख महंमद, संत तुकाराम, संत निळोबा इत्यादी संतांचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे संत जनाबाई, संत सोयराबाई, संत निर्मळाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा आणि संत बहिणाबाई शिऊरकर यांचाही अंतर्भाव होतो.

त्यांनी लोकांना दया, अहिंसा, परोपकार, सेवा, समता, बंधुभाव इत्यादी गुणांची शिकवण दिली. कोणी लहान नाही, कोणी मोठा नाही, सगळे सारखे अशी समतेची भावना संतांनी लोकांच्या मनांत निर्माण केली. तसेच महाराष्ट्रात समर्थ रामदासांनी आपले कार्य केले.



श्रीचक्रधर स्वामी

**श्रीचक्रधर स्वामी :** श्रीचक्रधर स्वामी मूळ गुजरातमधील एक राजपुत्र. वैराग्यवृत्ती धारण करून ते महाराष्ट्रात आले. येथे भ्रमण करत असता त्यांनी समतेचा उपदेश केला. त्यांना स्त्री–पुरुष, जातीपाती हे भेदभाव मान्य नव्हते.त्यामुळे त्यांना अनेक स्त्री–पुरुष अनुयायी मिळाले. त्यांनी स्थापन केलेल्या पंथास 'महानुभाव पंथ' असे म्हणतात. श्रीचक्रधर स्वामींच्या आठवणींचा संग्रह म्हणजे 'लीळाचरित्र' हा ग्रंथ होय.

**संत नामदेव :** संत नामदेव विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. ते नरसी गावचे राहणारे. त्यांनी अनेक अभंग रचले, कीर्तने केली व जनतेत



संत नामदेव

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक अ‍ॅप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक अ‍ॅप्स – Click Here